# University of Mumbai


परीक्षा विभाग,
महात्मा जोतीराव फुले भवन,
विद्यानगरी, कालिना,
सांताक्रुझ (पुर्व),
मुंबई — ४०००९८


क्र. परीक्षा / विज्ञान /८८२ / २०१४

परिपत्रक :—

मुंबई विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागांचे संचालक / प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांचे संचालक / प्रमुख, विविध विद्या शाखांचे अधिष्ठाते, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, तसेच विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, या कार्यालयाचे परिपत्रक No-Exam/Sc./491-1 of 2014 dated 8th August, 2014 ला अनुसरून महाविद्यालयांनी/संस्थांनी/विभागांनी स्विकारलेले विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र अद्याप विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे सादर केलेले नाहीत असे सर्व आवेदन पत्र दि. ९ सप्टेंबर, २०१४ पर्यंत परीक्षा विभागाकडे सादर करावेत. (तंत्रज्ञान विद्या शाखेचे महाविद्यालये **(Engineering Colleges)** वगळून) जेणेकरून संबंधीत परीक्षा आवेदन पत्रांवर परीक्षा विभागाला योग्य ती पुढील कार्यवाही करून; विद्यार्थ्यांचे **Hall Tickets** विहीत कालावधीत महाविद्यालय/संस्था/विभाग यांच्याकडे उपलब्ध करून देता येतील. दि. ९ सप्टेंबर, २०१४ या तारखेनंतर विद्यापीठाकडे प्राप्त झालेले परीक्षा आवेदन पत्र कोणत्याही परिस्थीतीत स्विकारले जाणार नाहीत.

तसेच पुढे संबंधीतानां असेही कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१४—१५ साठी ज्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश घेण्याची मुदत विद्यापीठ प्रशासनाने दि. १२ सप्टेंबर, २०१४ पर्यंत वाढवून दिलेली आहे; अश्या सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे ऑक्टोबर, २०१४ मध्ये होऊ घातलेल्या परीक्षांचे परीक्षा अर्ज विनाविलंब शुल्क स्विकारण्यात यावेत व ते परीक्षा अर्ज दि. १६ सप्टेंबर, २०१४ पर्यंत विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे विनाविलंब शुल्क सादर करण्यात यावेत.

तरी वरील बाबतीत संबंधीतांनी नोंद घेऊन योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

(दिनेश भोंडे)
परीक्षा नियंत्रक

मुंबई —४०००९८
सप्टेंबर ५, २०१४